श्री महेश वसंत डोळस, कनिष्ठ सहाय्यक, प्राथमिक आरोग्य केंद्र चांदा ता नेवासा, हे कार्यालयीन कामी अनाधिकृत गैरहजर असलेने त्यांचेवर शिस्तभंगाची कारवाई करणे बाबत..

अहिल्यानगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग-१
जिल्हा परिषद आदेश जा.क्र.साप्रवि/आस्था-३/१९४१४८४/७८८/२०२५
अहिल्यानगर दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केलेनुसार

वाचा:- १. इकडील दोषारोपपत्र जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/४३२३/१४२६/२०२३ दि ३१/१०/२०२३
२. वैद्यकिय अधिकारी, प्रा.आ.केंद्र चांदा यांचेकडील पत्र जा.क्र.वशि/आस्था/१३९/२०२३ दि २०/०९/२०२३
३. वैद्यकिय अधिकारी, प्रा.आ.केंद्र चांदा यांचेकडील पत्र जा.क्र.वशि/आस्था/०५/२०२४ दिनांक १०/०१/२०२४
४. या कार्यालयाकडील आदेश जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/४३२३/१९३/२०२४ दिनांक ३१/०१/२०२४
५. सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग नाशिक, यांचेकडील जा.क्र.विशा.४/खाचौ/ सी.आर.२१/२०२४ दिनांक १० मार्च २०२४
६. इकडील अंतिम कारणे दाखवा नोटीस क्र.साप्रवि-१/आस्था-३/१९४१४८४/३९८/२०२५ दिनांक ३१/०१/२०२४
७. वैद्यकिय अधिकारी, प्रा.आ.केंद्र चांदा यांचेकडील पत्र जा.क्र.वशि/आस्था/२२२/२०२५ दिनांक ०१/०७/२०२५ सोबत श्री डोळस यांना दिनांक २५/०६/२०२५ रोजी अंतिम कारणे दाखवा नोटीस बजावले बाबत पोहोच
८. वैद्यकिय अधिकारी, प्रा.आ.केंद्र चांदा यांचेकडील पत्र जा.क्र.वशि/आस्था/२४९/२०२५ दिनांक १५/०७/२०२५
९. सुनावणी इतिवृत्त दिनांक ०८/०८/२०२५
१०. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (६)

उपरोक्त नमुद विषयानुसार तुम्ही प्राथमिक आरोग्य केंद्र चांदा ता.नेवासा येथे कार्यरत असताना कार्यालयीन कामी अनाधिकृत गैरहजर असलेने संदर्भ क्रमांक १ नुसार सदर प्रकरणी तुम्हास दोषारोपपत्र बजावणेत येऊन खुलासा सादर करणेबाबत कळविणेत आलेले होते. सदर दोषारोप पत्राचा तुम्ही खुलासा सादर न केलेने त्यामुळे संदर्भ क्र.४ नुसार, तुमचे विरुध्द विभागीय चौकशी सुरु करणेकामी चौकशी अधिकारी तसेच सादरकर्ता अधिकारी यांची नेमणुक करणेत आली. संदर्भ क्र.५ चे सहाय्यक आयुक्त (चौकशी), नाशिक विभाग नाशिक, यांचेकडील चौकशी पुर्ण होऊन चौकशी अहवाल या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. सदर चौकशी अहवालात तुमचे विरुध्द ठेवणेत आलेले ४ आरोप सिध्द होत असलेचे निष्कर्ष प्राप्त झाले.

सदरचे चौकशी अहवालानुसार तुम्हास संदर्भ क्रमांक ६ नुसार अंतिम कारणे दाखवा नोटीस देणेत आली. सदरची नोटीस तुम्हास संदर्भ क्रमांक ७ नुसार बजावलेची पोहोच वैद्यकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र चांदा ता नेवासा यांचे मार्फत कार्यालयास प्राप्त झालेली आहे. तुम्हाला अंतिम कारणे दाखवा नोटीस बजावणेत येऊन तुम्ही अद्यापपर्यंत अंतिम कारणे दाखवा नोटीशीचा खुलासा सादर केलेला नसले बाबत संदर्भ क्रमांक ८ नुसार वैद्यकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र चांदा ता नेवासा यांनी कळविलेले आहे.

..२

संदर्भ क्रमांक ९ नुसार प्रकरणी सुनावणी ठेवणेत आलेली होती सदर सुनावणीमध्ये तुम्हास कामकाज तसेच अनाधिकृत गैरहजर असले बाबत म्हणणे सादर करणे बाबत कळविणेत आले. परंतु सदर बाबत तुम्ही यांनी कुठल्याच प्रकारे समर्पक म्हणणे तसेच खुलासा सुनावणी वेळी सादर केला नाही.

तुम्ही अंतिम कारणे दाखवा नोटीसीस खुलासा सादर केलेला नाही. तसेच तुमच्यावर ठेवणेत आलेले चारही आरोप सिध्द होत आहेत. तसेच दिनांक ०८/०८/२०२५ रोजीच्या सुनावणीवेळी समर्पक खुलासा सादर केलेला नाही. यावरुन तुम्हास अंतिम कारणे दाखवा नोटीशीमध्ये नमुद शिक्षा मान्य असलेचे या प्राधिकरणाचे मत आहे. तुम्ही कार्यालयीन कामी अनाधिकृत गैरहजर राहुन महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केल्याने शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरत आहे. सबब अंतिम कारणे दाखवा नोटीसीमध्ये नमुद केलेली महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (६) मधील तरतुदीनुसार तुम्हास सेवेतुन काढुन टाकणे ही शिक्षा या आदेशाव्दारे अंतिम करण्यात येत आहे.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक 202509040401.55 असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 04-09-2025 18:49:34
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

**श्री. महेश वसंत डोळस, कनिष्ठ सहाय्यक, प्रा.आ.केंद्र चांदा ता नेवासा**

**द्वारा व प्रत :- वैद्यकिय अधिकारी, प्रा.आ.केंद्र चांदा ता नेवासा**

२/- सदरचा आदेश श्री. महेश वसंत डोळस, कनिष्ठ सहाय्यक, प्रा.आ.केंद्र चांदा ता नेवासा यांना बजावून दुस-या प्रतीवर त्यांची स्वाक्षरी घेवून या कार्यालयास सादर करावी व सदर आदेशाची नोंद संबधितांच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा.

प्रत:- गट विकास अधिकारी, पंचायत समिती नेवासा

प्रत:- निवड नस्ती

स्वाक्षरीत/--
(आनंद भंडारी भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर